# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ३१/१०/२०२४ (गुरूवार) दुपार**

---

### पोलीस ठाणे केळवद हद्दीतील तिडंगी पारधी बेडा परिसरात
### अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. ३०/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे केळवद हद्दीतील तिडंगी पारधी बेडा परिसरात मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– महिपाल किशोर मारवाडी, वय ३९ वर्ष, रा. तिडंगी पारधी बेडा** हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टी काढतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) ४ ड्रम मध्ये ८०० लिटर मोहफुल सडवा किंमती २८,०००/–रु २) ३ डबकी मध्ये ६० लिटर मोहफुल दारू किंमती ६०००/–रू. ४) ४ प्लास्टिक ड्रम एकूण किंमती ४,०००/–रू. ५) व इतर दारू गाळण्याचे साहित्य. १३,६००/–रू. असा एकूण ५१,६००/–रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे केळवद यांच्या ताब्यात देण्यात आले. आरोपी विरुद्ध कलम ६५( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### पोलीस ठाणे देवलापार हद्दीतील मौजा करवई परिसरात
### अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. ३१/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे देवलापार येथील मौजा करवई परिसरात मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– श्यामजी बालाराम उईक, वय ६० वर्ष, रा. करवई ता . रामटेक जि. नागपूर** हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) दोन फ्लॅस्टिक डबकी मध्ये ५० लिटर मोहफुल गावठी दारू किंमती ५०००/–रु २) ४० मातीचे मडके मध्ये मोहाफुल रसायन सडवा एकूण ८०० लिटर प्रत्येकी लिटर ३५/– रुपये प्रमाणे एकूण किमती २८०००/– रु , ३) ३ खोल खड्यात प्लास्टिक मध्ये ६०० लिटर मोहफुल रसायन सडवा किंमत २१०००/– रू ४) एका लोखंडी ड्रम मध्ये ५० लिटर मोहफुल रसायन सडवा किंमती १७५० रू. ५) दारू गाळण्याचे साहित्य कि . २००० रू. असा एकूण किंमती ५७७५०/–रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे देवलापार यांचे ताब्यात देण्यात आले. वर नमूद आरोपी विरुद्ध कलम ६५( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर